**राष्ट्रीय प्रजनन आरोग्य संशोधन संस्था परळ, मुंबई**
(भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद ) व
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई**
यांचा संयुक्त उपक्रम

# "प्रजनन विषयक आरोग्यामध्ये पुरुषांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने नागरी वस्त्यांमध्ये करण्यात येणारी उपाययोजना"

## प्रजनन मार्ग व लैंगिक संबंध यातून निर्माण होणारे आजार (आर.टी.आय./एस.टी.आय.)

### प्रजनन/लैंगिक मार्गाच्या आजाराविषयी पुरुषांकरिता संदेश :-

१. प्रजनन मार्गाचे आजार आणि लैंगिक आजार या विषयी योग्य माहिती मिळण्या करीता जवळच्या आरोग्य केंद्रास भेट द्या किंवा डॉक्टरांशी संपर्क साधा.

२. जर आपणांस किंवा आपल्या पत्नीला लैंगिक आजार झाला असेल तर आपली व आपल्या पत्नीची तपासणी करुन उपचार करुन घ्या, जेणेकरुन पुर्नःसंसर्ग टाळता येईल.

३. लैंगिक आजाराचा संसर्ग टाळण्याकरीता निरोधचा वापर करा. शंका असल्यास समुपदेशकाला भेटा व चर्चा करा.

४. लैंगिक आजार झालेल्या व्यक्तींना एच.आय.व्ही. ची बाधा होण्याचा जास्त संभव असतो.

५. प्रजनन मार्गाचे आजार आणि लैंगिक आजारांविषयी चर्चा करण्यास लाजू नका किंवा भिती बाळगू नका.

### प्रजनन मार्गाचे आजार म्हणजे काय ?

प्रजनन मार्गाचे आजार हे एक प्रकारचे लैंगिक आजारच आहेत. या आजारामध्ये गर्भाशय, गर्भनलिका, योनीचे बाह्यांग, योनी, गर्भाशयाचे तोंड, अंडाशय हे स्त्रीयांमधील अवयव बाधीत होत असतात. ओटीपोटावरील सुज अर्थात पेल्व्हीक इन्फ्लोमेटरी डिसीज (PID) म्हणजेच बिजांडकोष, बीजवाहक नलिका, गर्भाशय मुख आणि गर्भाशय या सारख्या प्रजनन संस्थेचा विभिन्न अवयवांना झालेला जंतुसंसर्ग हाही एक प्रजनन आजार आहे. ज्यामुळे वंध्यत्व येऊ शकते किंवा जन्माला येणाऱ्या बाळास त्याचा संसर्ग होऊ शकतो.

### प्रजनन मार्गातील आजाराचे मुख्यत्वे तीन प्रकार आहेत :-

| | |
|---|---|
| अ. बाह्यांगावर दिसणारे आजार | - प्रजनन अवयवांवर आढळून येणारी वाढ |
| ब. आंतरीक आजार | - वैद्यकिय प्रकियेमुळे होणारे आजार |
| क. लैंगिक संबंधातुन पसरणारे आजार | - संभोगाद्वारे पसरणारे आजार |